**प्रेसनोट** दिनांक – ०८/०२/२०२३

**इतर लोकसेवक श्री.अजय सुरेश शिणवार, धंदा–बियर शॉप, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कार्यालय मान, बोईसर, ता.जि.पालघर व खाजगी इसम श्री.विक्रांत राजेंद्र चुरी, धंदा– वाहन चालक यांस लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांनी घेतले ताब्यात.**

| | | |
|---|---|---|
| १ | **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर |
| २ | **गुन्हा नोंद पोलीस ठाणे** | बोईसर पोलीस ठाणे, जि.पालघर |
| ३ | **कलम** | भ्र.प्र.अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७, ७ अ, १२ प्रमाणे |
| ४ | **लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | **१) इतर लोकसेवक श्री.अजय सुरेश शिणवार, धंदा–बियर शॉप, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कार्यालय मान, बोईसर, ता.जि.पालघर**<br>**२) खाजगी इसम श्री.विक्रांत राजेंद्र चुरी, धंदा–वाहन चालक** |
| ५ | **मागितलेल्या लाचेची रक्कम** | ५०,०००/–रूपये. |
| ६ | **स्विकारलेली लाचेची रक्कम** | २५,०००/– रुपये |
| ७ | **थोडक्यात हकिगत** | यातील तक्रारदार यांच्या ओळखीचे दोन इसम यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडून परवाना मिळणेकरीता ग्रामपंचायत कार्यालय मान यांच्याकडून नाहरकत दाखला दिल्याचा मोबदला म्हणून एका नाहरकत दाखल्याचे २५,०००/– रूपये याप्रमाणे दोन नाहरकत दाखल्यांचे एकूण ५०,०००/– रूपये लाचेच्या रक्कमेची आलोसे क्र.०१ यांनी मागणी केली व आरोपी क्र.०२ यांनी नमुद लाचेची रक्कम देण्यासाठी तक्रारदार यांना प्रोत्साहित केले. परंतु तक्रारदार यांना आरोपीत इतर लोकसेवक यास लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दिनांक ०७/०२/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयात तक्रार दिली आहे.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०७/०२/२०२३ रोजी आलोसे क्र.०१ यांचेकडे पंचासमक्ष पडताळणी केली असता, आलोसे क्र.०१ यांनी तक्रारदार यांचेकडे सदर कामाचे अनुषंगाने एका नाहरकत दाखल्याचे २५,०००/– रूपये याप्रमाणे दोन नाहरकत दाखल्यांचे एकूण ५०,०००/– रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी केली व आरोपी क्र.०२ यांनी नमुद लाचेची रक्कम देण्यासाठी तक्रारदार यांना प्रोत्साहित केले. त्यावरून लाचेचा सापळा आजमाविला असता एका नाहरकत दाखल्याचा मोबदला म्हणून लाचेची रक्कम २५,०००/– रूपये दिनांक ०८/०२/२०२३ रोजी १३:१४ वाजताचे सुमारास आलोसे क्र.०१ यांनी त्यांचे अजय बिअर शॉप, शॉप नं. २०४६, वारांगडे, बोईसर चिल्हार रोड, ता.जि.पालघर येथे तक्रारदार यांचेद्वारे स्विकारली असता आलोसे क्र.०१ यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयाचे सापळा पथकाकडून रंगेहाथ पकडण्यात आले असुन आरोपी क्र.०२ यांना ताब्यात घेऊन त्यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर, पालघर प. ४०१४०४.
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– —
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297
व्हॉट्स ॲप क्र. :– 9923346810


पोलीस उप अधीक्षक ... (शिक्का)

**(नवनाथ जगताप)**
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर

Scanned by CamScanner